दा. ता. १३-५-४३.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ९ पुणें, बुधवार, तारीख १२ मे १९४३ अंक ११

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ६,७२,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. ३,३६,४२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ५०,००,००० |

डायरेक्टर्स
श्री. घों. कृ. साठे, अध्यक्ष. श्री. वा. पुं. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार, श्री. श्यं. वि. रानडे, श्री. मा. रा. जोशी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख, श्री. फ. दो. पदमजी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कमोशीनें करून दिली जाते.
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां ४½% कर-माफ डिव्हिडंड दिलें गेलें. शेअर-विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर पांच रुपये वाढीनें विकण्यांत यावयाचा आहे व ती रक्कम शेअरचे मागणीबरोबर पाठवावी लागेल.
ग. ल. हळबे,
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### चिठोऱ्याचें महत्त्व

नॉर्वेनें सरकार शरण जाण्यापूर्वी त्यानें आपल्या माळवाहू आगबोटींस ब्रिटिश बंदरांचा आश्रय घेण्याबद्दल हुकूम दिला. एका वहीच्या फाडलेल्या चिठोऱ्यावर हा हुकूम पेन्सिलीनें लिहिण्यांत आला व तो रेडिओनें सर्व नॉर्वेजिअन आगबोटींस कळविण्यांत आला. त्यामुळें संयुक्त राष्ट्रांस बऱ्याच आगबोटी मिळूं शकल्या. कागदाचा हा चिठोरा लंडनमध्यें जतन करून ठेवलेला आहे. सध्या ग्रेट ब्रिटनमध्यें नॉर्वेचे २३ हजार खलाशी आहेत. लंडनमधील नॉर्वेचें सरकार इतर राष्ट्रांवर पैशाकरितां अवलंबून नाहीं.

### लंडन रेडिओवरील हिंदी लोकांसाठी कार्यक्रम

लंडन येथून हिंदी नागरिकांसाठी हिंदुस्थानी, गुजराती, मराठी व बंगाली ह्या चार भाषांतून रेडिओवर कार्यक्रम करण्यांत येतात. हिंदुस्थानाचा ३५ वर्षांचा दीर्घ अनुभव असलेले सर माल्कम डार्लिंग हे हिंदुस्थानी विभागाचे प्रमुख आहेत. बी. बी. सी. च्या ईस्टर्न सर्व्हिसमध्यें कपुरथळ्याच्या प्रिन्सेस इंदिरा ह्या इंग्रजींतून पार्लमेंटांतील चर्चा समजावून सांगतात. कलकत्ता विश्वविद्यालयांत नेमलेल्या इंग्रजी पुस्तकांवर ब्रिटिश साहित्यिक हिंदी विद्यार्थ्यांसाठी भाषणें करतात. युद्धासंबंधीं बरोबर माहिती पुरविणें, ग्रेट-ब्रिटनमधील रहाणी व युद्धपरिस्थिति ह्यांची पार्श्वभूमि समजावून देणें व हिंदी सैनिकांची करमणूक करणें हे तीन उद्देश लंडनच्या रेडिओच्या हिंदी विभागापुढें आहेत. हिंदी सैनिकांच्या कुटुंबियांचे संदेश त्यांच्याच आवाजांत लंडन रेडिओवरून सैनिकांस ऐकविले जातात.

### अलेंबिक केमिकल वर्क्स, लि.

वरील कंपनीची १९४२ मध्यें ३३½ लक्ष रुपयांची विक्री झाली. १९४० व १९४१ मधील विक्रीचे आकडे अनुक्रमें १५ लक्ष रुपये व २१½ लक्ष रुपये असे होते. नफ्याची रकम १९४२ सालीं ६ लक्ष, ३७ हजार रुपये झाली. भागीदारांस १२% डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या १०० रुपयांच्या भागाची मुंबई स्टॉक एक्सचेंजवर ३४५ रुपयांपर्यंत किंमत गेली आहे.

### कला चित्र लि.

वरील नांवाची २५ लक्ष रुपये भांडवलाची सिनेमा कंपनी मि. एच. बी. वाडिया ह्यांनीं मुंबई येथें स्थापन केली आहे.

### ना. पंतलु ह्यांची सहकारी चळवळीस देणगी

ना. रामदास पंतलु ह्यांनीं आपल्या घराचा कांहीं भाग हिंदी सहकारी चळवळीस देणगी म्हणून दिला आहे. सहकार व ग्रामोद्योग ह्यांचा अभ्यास आणि संशोधन ह्यांचें तें एक केंद्र निर्माण व्हावें अशी त्यांची इच्छा आहे व त्यासाठी त्यांनीं आपला पुस्तकसंग्रहहि दिला आहे. ना. पंतलु ह्यांच्या घरींच इंडियन को. रिव्ह्यू ह्या इंग्रजी त्रैमासिकाचा आठ वर्षांपूर्वी जन्म झाला व त्याच ठिकाणीं सहकारी इन्स्टिट्यूटस असोसिएशन व प्रांतिक बँकांची असोसिएशन ह्यांचें गेलें संयुक्त अधिवेशन भरलें होतें.

### इंग्रजी संगीताचा साप मारण्यास उपयोग!

एक इंग्रज स्त्री हिंदुस्थानांतील तिच्या बंगल्याच्या व्हरांड्यांत बसली असतांना तिनें एका बेडकाच्या मागें साप जात असलेला पाहिला. बेडकानें डबक्यांत उडी टाकली, त्याचे मागोमाग सापहि गेला. इंग्रज स्त्रीनें नुकताच रेडिओ लावून लंडन येथील संगीत सुरू केलें होतें, तें सापाचे कानीं पडून तो ऐकूं लागला, त्यामुळें इंग्रज स्त्रीस साप मारण्यास अवसर मिळाला.

### सोन्याचें घटतें उत्पादन

१९३१ सालापासून १९४० पर्यंत सोन्याचें वार्षिक जागतिक उत्पादन २ कोटि २५ लक्ष औंसांवरून ४ कोटि, ५ लक्ष औंसापर्यंत वाढत गेलें, परंतु त्यानंतर उत्पादन घटूं लागलें. गेल्या तीन वर्षांतील उत्पादनाचे आकडे खाली दिले आहेत:—

| | |
|---|---|
| १९४० | ४ कोटि, ५ लक्ष औंस |
| १९४१ | ४ कोटि औंस |
| १९४२ | ३ कोटि, ६० लक्ष औंस |

जागतिक उत्पादनांत दक्षिण आफ्रिकेचा हिस्सा ४०% (१ कोटि, ४० लक्ष औंस) व ब्रिटिश साम्राज्याचा हिस्सा ६२% आहे.

### मुंबई प्रांतांतील मजूर संघ

| | १ जून, १९४२ | ३१ डिसेंबर, १९४२ |
|---|---|---|
| एकूण संख्या | १८१ | १८९ |
| त्याचे सभासद | १,७९,१०५ | १,८५,३५६ |
| मुंबई शहरांतील संघांचे सभासद | १,०९,१०६ | १,२४,२४३ |
| अहमदाबाद शहरांतील संघांचे सभासद | ४६,१४९ | ३४,८५७ |
| इतर ठिकाणच्या संघांचे सभासद | २३,८७० | २६,२५६ |

### लष्करासाठी भाजीपाला

मुंबई प्रांतांतील सैनिकांना भाजीपाला पुरविण्याची योजना ऑगस्ट, १९४२ मध्यें सुरू झाली व आक्टोबर, १९४२ पासून लष्करी केंद्रांना भाजीपाला मिळूं लागला. दररोज ३ ते ४ हजार शेर भाजी ह्या योजनेप्रमाणें पुरविली जाते. भाजीपाला लावण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन देऊन त्यांस पाणी-पुरवठा व इतर सहाय्यहि दिलें जातें. ठराविक किमान किंमत व बाजारभाव ह्यांपैकीं जास्त असेल ती किंमत शेतकऱ्यांस मिळते. लष्कराचें ठाणें हाललें तर भाजी उरते ती स्थानिक बाजारांत विकली जाते व किंमत कमी आल्यास लष्करी खातें तूट भरून देतें. योजनेप्रीत्यर्थ होणाऱ्या ५६ हजार रुपयांच्या खर्चापैकीं निम्मा खर्च लष्करी खातें सोसणार आहे.

### अमेरिकेंतील निग्रो डॉक्टर व इस्पितळें

अमेरिकेंत निग्रो लोकांसाठी एकूण ११० इस्पितळें आहेत, त्यांत १० हजार रुग्णांची सोय आहे. निग्रो लोकांची संख्या १ कोटि, ३० लक्ष इतकी आहे. निग्रो डॉक्टरांची संख्या ४,००० आहे. निग्रो लोक श्वेतवर्णीय डॉक्टरच पसंत करितात, असें दिसतें. अमेरिकन मेडिकल असोसिएशननें १९४० सालीं विचारलेल्या प्रश्नास, ६,३०० पैकीं ४,२३० इस्पितळांनीं, "आम्हीं निग्रो रुग्णांस घेऊं" असें उत्तर दिलें व १५७७ इस्पितळांनीं नकार दर्शविला.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | १४६ |
| २ युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज | १४७ |
| ३ तांदुळाच्या पिकाचा अंदाज | १४८ |
| ४ आकड्यांचा खेळ | १४८ |
| ५ नर्सेस | १४८ |
| ६ स्फुट विचार... | १४९ |
| ट्युनिशियांतून शत्रूची हकालपट्टी—लंडनमधील शिलका—इंग्लंडच्या धनकोपणाच्या स्थानाचें भवितव्य — जर्मनीच्या युद्धखर्चाचा बोजा—मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने. | |
| ७ बँकिंगविषयक एक प्रश्न | १५१ |



# अर्थ

बुधवार, ता. ११ मे, १९४३


## युद्धकालांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज

कित्येक प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं हिंदुस्थान सरकारच्या चलनप्रसाराच्या धोरणांतील दोष दाखवून त्याचा संबंध चढत्या बाजारभावाशीं कसा निकट आहे आणि फाजील चलनाचे दुष्परिणाम युद्धप्रयत्नांच्या यशस्विततेच्या दृष्टीनें कसे टाळले पाहिजेत ह्याविषयीं विधायक सूचना केल्या असल्याविषयींची माहिती "अर्था"मध्यें येऊन गेली आहे. अर्थशास्त्रज्ञांनीं काढलेल्या पत्रकांत प्रतिपाद्य विषयाचें विवेचन त्रोटक असें असून त्यांतील मुद्दे व विधानें आकडे व इतर पुरावे यांचे सहाय्यानें विशद करणें अशक्य होतें. ह्याकारणानें तें पत्रक सूत्रांच्या स्वरूपांत प्रसिद्ध झालें आहे असें म्हणतां येईल. सरकारचें चलनविषयक धोरण कसें सदोष आहे हें सर जेरमी रेस्मन ह्यांच्या अंदाजपत्रक व करांचा, वार्षिक कायदा ह्यांचे संबंधांत झालेल्या भाषणांतील खुलाशानंतर त्वरित सरकारचे निदर्शनास आणणें आवश्यक असल्यानें अर्थशास्त्रज्ञांनीं आपल्या पत्रकांत, तपशिलांत शिरण्याचें टाळलें आणि मुद्दे, सिद्धांत व सूचना थोडक्यांत पुढें मांडल्या. सामान्य वाचकांच्या दृष्टीनें दिसणारी ही खुलासेवार व आकडेवार विवेचनाची उणीव गोखले इंस्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. एन्. व्ही. सोहोनी ह्यांनीं "युद्ध आणि हिंदुस्थानचें आर्थिक धोरण" हें पुस्तक प्रसिद्ध करून उत्कृष्ट रीतीनें भरून काढली आहे*. युद्धकाळांतील राष्ट्रीय चलन आणि कर्ज आणि हिंदी सरकारचें त्यासंबंधांतील धोरण हा सध्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि त्याचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन उद्बोधक झाल्यावांचून राहणार नाहीं. किंबहुना, असें पुस्तक प्रसिद्ध करून प्रा. धनंजयराव ह्यांनीं महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

* "War and Indian Economic Policy" By D. R. Gadgil, M.A., M. Litt. and N.V. Sohoni, M. A., Gokhale Institute of Politics and Economics. Publication No. 10. Price Rs. 5/-.

पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिल्यांत चलन आणि बाजारभाव ह्यांच्या परस्पर संबंधाचें विवेचन असून दुसऱ्यामध्यें आर्थिक व सांपत्तिक धोरणाची चर्चा आहे. चलनाचा विस्तार किती व कसा कसा झाला ह्याविषयींचे तपशीलवार आकडे देऊन बाजारभावांतील वाढींची प्रगति कशी घडून आली हें दर्शवलें आहे आणि ह्या दोहोंचा निकट संबंध किती आहे ह्याचें विवेचन केलें आहे. त्यासंबंधांत खालील आकडे मुद्याचे आहेत. व्यवहारांत खेळणाऱ्या चलनी नोटांची किंमत ऑगस्ट, १९३९ मध्यें १७० कोटि रुपये होती. ती १९४० चे प्रारंभीं २२६ व अखेरीस २२५ कोटि झाली. १९४१ चे अखेरीस हा आंकडा ३०४ कोटींपर्यंत, १९४२ चे शेवटीं ५६० कोटींपर्यंत व चालू वर्षाच्या फेब्रुआरींत ६०९ कोटि रुपयांपर्यंत चढला. त्याच अवधींत बाजारभावांचा शेकड्यांच्या प्रमाणांत मोजणारा आकडा ऑगस्ट, १९३९ मधील १०० पासून निघून प्रथम त्या वर्षाचे अखेर १३८ झाला, व पुढच्या साल अखेर ११४ वर उतरला. पुढें तो सारखा चढत चालला आणि १९४१ अखेर १४० होऊन १९४२ च्या शेवटीं १८६ वर गेला. १९४३ चे प्रारंभीं हा आकडा १९५ चे वर चढला. नोटांमध्यें झालेली सारखी वाढ व बाजारभावांतली वाढ यांचा परस्पर संबंध वरील आंकड्यांवरून स्पष्ट होत आहे. खरें पाहिलें असतां कांहीं विशिष्ट कारणामुळें बाजारभाव नोटांच्या बरोबरीनें चढले नसून त्यांच्यामागें रेंगाळले आहेत. ह्यावरून बाजारभाव चढले म्हणून अधिक नोटा काढाव्या लागल्या ह्या विधानाचा फोलपणा सिद्ध होऊन फाजील नोटांच्या पुरवठ्यामुळें किंमती चढल्या हा सिद्धांत खरा ठरतो हें येथें जातां जातां सांगणें आवश्यक आहे.

पण वाढत्या प्रमाणांतील चलनी नोटा कशाच्या आधारावर काढण्यांत आल्या? रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत एका सरकारी वटहुकुमानें दुरुस्ती करण्यांत आली आणि त्या बँकेच्या चलनी नोटांच्या विभागांतील एकूण जिंदगीचा निदान दोन पंचमांश भाग सोनें किंवा स्टर्लिंगमधील रोखे ह्यांच्या स्वरूपांत असावा आणि बाकीचा तीन-पंचमांश रुपये, रुपयांतील रोखे व अंतर्गत हुंड्या ह्यांमध्यें असावा असें नवीन प्रमाण निश्चित करण्यांत आलें. ह्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेजवळचे स्टर्लिंगमधले रोखे ऑगस्ट १९३९ मध्यें ५९ कोटि रुपये किंमतीचे होते, ते १९४२ अखेर ३१८ कोटींचे झाले. म्हणजे त्यांत ५८० टक्के इतकी वाढ झाली. एवढी मोठी वाढ स्टर्लिंग रोख्यांत झाली कशी? ज्यांचीं चलनें ब्रिटिश स्टर्लिंग पौंडाशीं संबद्ध आहेत अशा देशांचें इंग्लंडकडून येणें त्यांच्या नांवावर लंडनमध्यें पौंडांत जमा होत असतें, त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें ह्या देशांत केलेल्या खर्चाबद्दलच्या इंग्लंडकडून मिळावयाच्या रकमा त्यांच्या खात्यावर लंडनमध्यें जमा होत आहेत, आणि त्या ब्रिटिश रोख्यांत गुंतवल्या जात आहेत. ह्या प्रकारची वाटेल तेवढी गुंतवण रिझर्व्ह बँकेंत करतां येते आणि तिच्या आधीचपट नोटा हिंदुस्थानांत काढतां येतात. हिंदी चलननिधीमध्यें स्टर्लिंग रोखे धारण करण्याचा मूळ हेतु हुंडणावळीचें स्थैर्य राखणें हा होता. परंतु युद्धपरिस्थितींत हुंडणावळ नियंत्रित झाल्यानें लंडनमधील स्टर्लिंग निधीचा उपयोग चलन विस्तारास आळा बसण्यांत न होता उलट त्यास उत्तेजन देण्यांत होत आहे. ही वस्तुस्थिति प्रा. गाडगीळ ह्यांनीं मार्मिक रीतीनें विशद केली

आहे. त्यांनी हेंहि दाखविलें आहे की हिंदुस्थान व इतर साम्राज्यांतर्गत देशांच्या लंडनमधील शिलका ब्रिटिश सरकारास सहाय्यकारक होत आहेत. त्यांच्या रकमा इतकीं ट्रेझरी बिलें ब्रिटिश बँकांच्या गळ्यांत बांधण्याची जरूरी कमी होते. पण ब्रिटिश तिजोरीची ह्या रीतीनें सोय होऊन तिचा चलनविस्तार मर्यादित होत असतां हिंदुस्थान देशावर मात्र अगदीं उलट परिणाम होऊन आमच्या लंडनमधील शिलकांच्या आधारावर येथें नोटांचा विस्तार सारखा चालला आहे.

चलनी नोटा व लंडनमधील स्टर्लिंग शिलका ह्यांचा विस्तार आणि बाजारभावांतली वाढ ह्यांची सुलभ कल्पना यावी म्हणून पुस्तककर्त्यांनी दिलेल्या तक्त्यांतून खालील तुलनात्मक आंकडे निवडून आम्हीं देत आहों.—

| वर्ष अखेर महिना | खेळत्या नोटा (कोटि रुपये) | बाजार भाव शत-प्रमाण | स्टर्लिंग रोखे (कोटि रुपये) | हिंदी रोखे (कोटि रुपये) |
|---|---|---|---|---|
| १९३९ ऑगस्ट | १७० | १०० | ५९ | ३७ |
| १९३९ डिसेंबर | २१९ | १३८ | ९६ | ३७ |
| १९४० „ | २२५ | ११४ | १३१ | ४९ |
| १९४१ „ | ३०४ | १४० | २१३ | ४२ |
| १९४२ „ | ५६० | १८६ | ३८८ | १२६ |
| १९४३ फेब्रुआरी | ६०९ | — | ३७८ | १८४ |

### तांदुळाच्या पिकाचा अंदाज
### (१९४२-४३)

| | |
|---|---|
| पिकाखालील क्षेत्र | ७,४९,१९,००० एकर |
| गेल्या वर्षीपेक्षां वाढ | २% |
| उत्पादन | २,४५,३३,००० टन |
| गेल्या वर्षीपेक्षां घट | ३% |
| दर एकरी उत्पादन | |
| १९३८-३९ | ७३१ पौंड |
| १९३९-४० | ७७६ „ |
| १९४०-४१ | ६८० „ |
| १९४१-४२ | ७७२ „ |
| १९४२-४३ | ७३४ „ |

प्रांतवार लागवड—

| | एकर | एकूण लागवडीशीं प्रमाण % |
|---|---|---|
| बंगाल | २,३१,४२,००० | २८·८ |
| मद्रास | १,०३,९४००० | १३·३ |
| बिहार | ९२,७५,००० | १२·६ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ७६,१७,००० | १०·३ |
| आसाम | ५०,८३,००० | ७·० |
| ओरिसा | ५०,५५,००० | ६·८ |
| मुंबई | २६,२८,००० | ३·२ |

### तांदुळाची निर्गत (टन)

| वर्ष | ब्रह्मदेशांतून | बंगाल व ओरिसा मधून | मुंबई, मद्रास व सिंधमधून |
|---|---|---|---|
| १९३७ | ४,४३,५०० | १,२३,४०० | १,२६,२०० |
| १९३८ | | १,२८,६०० | १,३५.६०० |
| १९३९ | | १,२७,७०० | १,५१,६०० |
| १९४० | | ८३,२०० | १,६१,२०० |
| १९४१ | | ८२,६०० | २,२१,००० |

### आकड्यांचा खेळ

सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट ह्या अमेरिकेंत प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकानें त्या देशासंबंधानें खालील माहिती आकड्यांनिशी दिली आहे.—

युद्ध सुरू होतांच थोड्या महिन्यांत आपल्या जुन्या-नव्या सैनिकांच्या उपयोगासाठी अमेरिकेनें सुमारें साडेचार कोटि इतक्या निरनिराळ्या प्रकारांच्या टोप्या तयार केल्या.

* * *

इंग्लंडमध्यें आइस्क्रीम तयार करण्यास बंदी करण्यांत आली. तीस अनुलक्षून असें सांगण्यांत आलें आहे कीं ही बंदी अमेरिकेंत लोकांस जशी जाचक होईल तशी ती ब्रिटिश जनतेस होणें शक्य नाहीं. सुमारें ४॥ कोटि वस्तीच्या ब्रिटनमध्यें दरवर्षी तीन कोटि गॅलन आइस्क्रीम खपतें, पण केवळ वीस लक्ष वस्तीच्या एकट्या फिलाडेल्फिया शहरांत पावणे दोन कोटि गॅलन आइस्क्रीमचा एक वर्षांत फडशा उडतो.

* * *

मृत्यूच्या संख्येच्या बाबतींत १९४१ व १९४२ हीं वर्षे फार चांगलीं गेलीं आहेत. १९४२ च्या पहिल्या सहामाहींत दर हजार लोक संख्येस दहा पेक्षांहि कमी असें मृत्यूचें प्रमाण पडलें. १९४१ च्या समान सहामाहींतलें हें प्रमाण पावणेअकरा होतें. हिंदुस्थानशीं तुलना करतां हें प्रमाण अमेरिकेंत निम्म्यापेक्षांहि कमी आहे. पाश्चात्य देशांतील लोकांच्या आरोग्याची ह्या आकड्यावरून कल्पना येते.

* * *

प्रत्येकीं आठ हजार वस्ती असलेल्या गांवांत एकूण अमेरिकन लोकसंख्येपैकीं केवळ ४ टक्के लोक १७९० मध्यें रहात असत. आतां हें प्रमाण ५० टक्क्यांचे वर गेलें आहे.

* * *

कांहीं गणित्यांनीं असा हिशेब केला आहे कीं कुटुंबाचें एक जेवण पार पाडण्यास घरमालकिणीस सरासरीनें एकूण ३,६९६ पावलें टाकावीं लागतात. म्हणजे सुमारें दीड मैलांचा प्रवास होतो.

* * *

अमेरिकेंत १९३० ते १९४० ह्या दहा वर्षांच्या अवधींत सौंदर्यवर्धक साधनांचा खप ३५ टक्क्यांनीं वाढला. त्या प्रमाणांत अमेरिकन स्त्रियांच्या सौंदर्यांत सुधारणा झाली काय ?

### नर्सेस

ऑक्झिलिअरी नर्सिंग सर्व्हिसमध्यें दाखल होण्यासाठी आतांपर्यंत १५,००० स्त्रियांचे अर्ज आले आहेत. अर्जदारांपैकी ४,९३० मद्रास प्रांतांतील आहेत, १,४५० बंगालमधील आहेत व १,३०० मुंबई प्रांतांतील आहेत. आतांपर्यंत एकूण १,९५२ नर्सेसचें शिक्षण पुरें झालें आहे. एकूण नर्सेसपैकी मद्रास प्रांतांतील एक तृतीयांश आहेत व मुंबई प्रांतानें एक पंचमांश नर्सेस दिल्या आहेत. नर्सेसची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| अँग्लो इंडियन | ६०३ |
| डोमिसाइल्ड युरोपियन | १४३ |
| युरोपियन | ३३९ |
| हिंदी ख्रिस्ती | ५४३ |
| हिंदु | १२३ |
| पारशी | २४ |
| शीख | ५ |
| मुसलमान | ११ |

# स्फुट विचार

## ट्युनिशियांतून शत्रूची हकालपट्टी

बिझर्टा आणि ट्यूनिस हीं महत्त्वाचीं बंदरें जनरल ऐसनहॉव्हर ह्यांच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या मित्र राष्ट्रांच्या सैन्यांनीं पाडाव करून हस्तगत केलीं असल्यानें जर्मनी व इटली ह्यांचा उत्तर आफ्रिकेंतला प्रतिकार आतां संपला आहे. ट्युनिशियामधला संग्राम गेले सहा महिने चालला होता आणि अमेरिकन व ब्रिटिश संयुक्त फौजांस त्यांत क्रमाक्रमानें जय मिळत जाऊन अखेरीस शत्रूची हकालपट्टी होणार ह्यांत कधींच संशय नव्हता. जर्मन व इटालिअन फौजा तीन बाजूंनीं घेरल्या गेल्या होत्या आणि राहिलेल्या समुद्राच्या बाजूनें निसटून जाणें त्यांस शक्य नव्हतें. त्या परिस्थितींतहि बाहेरून मदत मिळणें हळूहळू कठिण होत चाललें असतां त्या फौजा सारखी पिछेहाट करीत होत्या. बिझर्टा व ट्यूनिस मित्र राष्ट्रांच्या सैन्यांच्या दृष्टिपथांत आलीं तरी त्या महत्त्वाच्या बंदरांच्या बचावासाठीं शत्रु निकरानें लढेल आणि कांहीं आठवडे तरी तग धरील असें सामान्यत: वाटत होतें. परंतु तसें झालें नाहीं आणि अखेरीस शत्रूचा प्रतिकार नाहींसा झाला. त्याच्या तुरळक तुकड्यांच्या हातून तगाव धरणें होणार नाहीं आणि त्यांस शरणच यावें लागेल. विजयी मित्रराष्ट्रांच्या हातीं शत्रूचे हजारो सैनिक सापडले आहेत आणि सापडत आहेत. लढाऊ सामान मागें राहिलें आहे तेंहि त्यांस मोठ्या प्रमाणांत मिळत आहे. युरोपांत दुसरी आघाडी चालू करण्याच्या मार्गांतला मोठा अडथळा ट्युनिशियांतील मित्रराष्ट्रांच्या महत्त्वाच्या विजयामुळें नाहींसा झाला आहे. आफ्रिकेंत आतां भूमध्य समुद्राचा सबंद किनारा मित्रराष्ट्रांच्या ताब्यांत आल्याकारणानें युद्धाच्या इतिहासांत नवीन प्रकरणास आतां प्रारंभ होणार असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकेची व इंग्लंडची मोठी फौज दुसरीकडे लढण्यास मोकळी झाली आहे आणि तिकडे लढाऊ सामुग्रीचा उपयोगहि मोठ्या प्रमाणावर करतां येईल.

## लंडनमधील शिलका

हिंदुस्थानच्या लंडनमध्यें सांठणाऱ्या शिलकांचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केला आहे. ह्या शिलका इंग्लंडमध्यें कां जमा होतात आणि त्यांच्या तारणावर ह्या देशांत चलनी नोटा काढल्या गेल्यामुळें फाजील चलनाचा परिणाम बाजारभावांवर कसा होतो ह्याचें विवेचन प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नव्या पुस्तकाच्या परीक्षणाचे ओघानें करण्यांत आलें आहे. ज्यांचीं चलनें पौंड स्टर्लिंगवर आधारलेलीं आहेत, अशा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत व इतर देशांचें इंग्लंडकडून मिळावयाचें येणें लंडनमध्येंच पडून रहातें आणि तेथें तें ब्रिटिश अल्प मुदतीच्या रोख्यांत गुंतवावें लागतें ही गोष्ट प्रा. गाडगीळ ह्यांनी विशद केली आहे. हिंदुस्थान व इतर साम्राज्यांतर्गत देश ह्यांच्या येणें रकमा लंडनमध्यें ह्या रीतीनें कशा गुंतवल्या आहेत. ह्याचे तुलनात्मक आकडे " एकॉनॉमिस्ट " ह्या ब्रिटिश साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेले आतांच हातीं आले आहेत ते आम्ही स्थूलमानानें खालीं देत आहों :-

लंडनमधील शिलका

| | कोटि पौंड | कोटि पौंड |
|---|---|---|
| हिंदुस्थान ( जाने. ) | २१·४ ( १९४२ ) | ३०·८ (१९४३) |
| ऑस्ट्रेलिया (ऑक्टो.) | ३·६ ( १९४१ ) | ५·९ (१९४२) |
| न्यूझीलंड (ऑगस्ट) | १·२ ( १९४१ ) | २·५ (१९४२) |
| आयर ( सप्टें. ) | ८·१ ( १९४१ ) | ९·३ (१९४२) |
| दक्षिण आफ्रिका ( नोव्हें. ) | २·१ ( १९४१ ) | ·१ (१९४२) |
| | ३६·८ | ४८·७ |

## इंग्लंडच्या धनकोपणाच्या स्थानाचें भवितव्य

साम्राज्यांतर्गत देशांच्या लंडनमधील शिलकांमध्यें हिंदुस्थानच्या पैशाचें प्रमाण किती मोठें आहे हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. इंग्लंडचें बाहेर गुंतवलेलें भांडवल आतां संपुष्टांत आलें आहे. ऋणको देशांनीं इंग्लंडकडून घेतलेलीं कर्जे फेडण्यांत आलीं आहेत आणि त्यांच्या लंडनमधील शिलकाच वाढत आहेत. ह्याचा अर्थ असा होतो कीं युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय धनको ह्या नात्याचें स्थान नाहींसें होऊन त्या राष्ट्रास ऋणको देशांच्या वर्गांत जाऊन बसावें लागेल. ह्या बदललेल्या परिस्थितीकडे " एकॉनॉमिस्ट " पत्रानें लक्ष वेधलें आहे. लंडनमधील आपल्या साचलेल्या शिलकांचा पैसा परत कसा आणावयाचा आणि त्याचा योग्य उपयोग कसा करावयाचा हा हिंदुस्थानपुढें अवघड प्रश्न आहे. युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेचें हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. तीमध्यें स्टर्लिंगचें मोल काय राहील आणि हिंदुस्थानच्या लंडनमधील शिलकांचे रुपयांमध्यें परिवर्तन कसें होईल ह्या बाबी आज अनिश्चित आहेत. त्यांचे संबंधांत हिंदुस्थानच्या आर्थिक हितांचें योग्य रक्षण होईल ह्याविषयीं सरकार आणि जनता ह्यांनीं दक्षता बाळगिली पाहिजे. ह्याबाबतींत हिंदी बिनसरकारी मत स्पष्टपणें व्यक्त झालेंच आहे आणि त्याचा योग्य विचार करण्याचें आश्वासन सरकारच्या वतीनें देण्यांत आलें आहे. ह्या विषयाच्या विशेष महत्त्वाच्या दृष्टीनें तो सतत नजरेपुढें ठेवला जाणें अगत्याचें आहे.

## जर्मनीच्या युद्धखर्चाचा बोजा कोणावर पडतो ?

जर्मनी आपल्या युद्धखर्चाचा बोजा शक्यतितका युरोपांतील अंकित देशांवर टाकीत आहे. ह्या देशांकडून जर्मनीला दरसाल सुमारें ३० अब्ज राइशमार्क इतकी मदत मिळते. युरोपांतील देश जर्मनीकडे माल पाठवीत आहेत, त्यामुळें निर्माण होणारें जर्मनीचें देणें जर्मनी चालू उत्पन्न म्हणूनच समजत आहे. जर्मनीनें पादाक्रांत देशांत केलेली मालमत्तेची, अन्नपुरवठ्याची व मालाची लूट ही वेगळीच. सोनें व मौल्यवान जिनसा ह्यांचाच केवळ लुटीचा आकडा १५ अब्ज रुपयांवर आहे ! युरोपियन देश आपल्या युद्धपूर्व उत्पन्नाचा एक पंचमांश ते एक तृतीयांश इतका भाग जर्मनीला खंडणी म्हणून देत आहेत. जर्मनी अंकित देशांत कर्जे उभारून पैसा वसूल करीत आहेच. ह्या देशांत आपल्या फौजा ठेवून जर्मनी शांतता राखीत आहे, त्याचा खर्च अंकित देशांवरच पडतो. फ्रान्स ह्याप्रमाणें प्रथम दररोज ४० कोटि फ्रँक खंडणी देत असे. १९४२ सालीं हा आकडा जर्मनीनें

कमी करून १० कोटि फँकवर आणला. खंडणीची रक्कम आतां वाढवून ती ५० कोटि फँक करण्यांत यावयाची आहे. बेल्जम व इतर देश ह्यांचीहि अशीच अवस्था झाली आहे. युद्धापूर्वीपासूनच जर्मनी युरोपियन देशांतून, विशेषतः बाल्कन्समधून, आपली आयात वाढवीत होता. त्या देशांकडून माल घ्यावयाचा परंतु परत माल मात्र पाठविण्याचा नाहीं, ह्या धोरणामुळें जर्मनीचें त्या देशांस प्रचंड देणें उत्पन्न झालें आहे व मुख्यतः त्याचे आधारावरच अंकित देशांचें चलन अधिष्ठित झालें आहे. युद्धसमाप्तीनंतर जर्मनी ह्या देशांकडे पुनः माल पाठवूं लागेल, अशा पूर्ण विश्वासावरच युरोपियन देशांनीं अवलंबून रहाणें भाग आहे. गेल्या महायुद्धानंतर जर्मनीवर वार्षिक २३ कोटि पौंडांची खंडणी बसविण्यांत आली, ती १९२४ सालीं १२½ कोटि पौंडांवर आणण्यांत आली. १९१९ ते १९३१ ह्या मुदतींत जर्मनीनें २०० कोटि पौंड खंडणी भरली. आज युरोपियन राष्ट्रांकडून जर्मनीस मिळणाऱ्या वार्षिक खंडणीचा आकडा ह्या सुमारांतच आहे. ह्यावरून युरोपच्या पिळवणुकीची कल्पना येईल.

### मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने

मुंबई प्रांतांतील इस्पितळें व दवाखाने ह्यासंबंधींचा १९३९–४१ चा त्रैवार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून इस्पितळांची, दवाखान्यांची व त्यांचा फायदा घेणाऱ्या रुग्णांची व रोग्यांची संख्या १९३६–३८ च्या मानानें वाढलेली दिसून येते. १९४१ सालीं मुंबई प्रांतांतील सर्व इस्पितळें व दवाखाने ह्यांत मिळून ४८ लक्ष, ३८ हजार रोग्यांना औषधें मिळालीं, त्यांपैकी १२,१४३ रोगी मरण पावले. १९३९–४१ ची ह्याबाबतची वार्षिक सरासरी ४७ लक्ष, ६४ हजार रोगी व ११,०९७ मृत्यू अशी आहे. १९३६–३८ ची वार्षिक सरासरी ३८ लक्ष, ८६ हजार रोगी व ९,६२५ मृत्यू अशी होती. १९३९ व १९४१ चे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.:–

| | १९३९ | १९४१ |
|---|---|---|
| इस्पितळांत दाखल केलेले रोगी (रोजची सरासरी) | ५,७०८ | ६,३६४ |
| बाहेरून औषध घेणारे रोगी (रोजची सरासरी) | ३८,२७२ | ४०,९९२ |
| इस्पितळांत उपचार केलेले रोगी | ३८,८१,२६१ | ४०,२८,३८९ |
| बरे झालेले रोगी | ७४,२९३ | १,०४,०१८ |
| मृत्यूचें एकूण रोग्यांशीं प्रमाण% | ७·९ | ६·३ |
| इस्पितळांत किती खाटांची सोय | ६,८६० | ७,५८८ |
| इस्पितळें व दवाखाने ह्यांची संख्या | ४५० | ७३९ |
| मेडिकल ऑफिसर्सची संख्या | १२११ | १४४० |
| नर्सेसची संख्या | ८५८ | ११८५ |

इस्पितळें व दवाखाने ह्यांतील बहुसंख्य (८,७५,७९५) रोगी मलेरियाचे होते. १९३८–४१ मध्यें सरासरीनें दरसाल ६० लक्ष रुपये दवाखाने व इस्पितळें ह्यांवर खर्च झाले. फी वगैरे उत्पन्न वजा केलें, तर वार्षिक निव्वळ खर्चाची सरासरी ५५ लक्ष रुपये पडते. खेडेगांवांत डॉक्टरी उपचार उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेस अनुसरून ३३० केंद्रें मंजूर करण्यांत आलीं त्यांपैकी २७० केंद्रें (१०७ ॲलोपॅथिक, १५२ आयुर्वेदिक व ११ युनानी) १९४१ मध्यें चालू झालीं होतीं. ८१ नर्स–दायांची नेमणूक व्हावयाची, परंतु पुरेसा लायक उमेदवारांचे अभावीं फक्त ४९ च नेमणुका होऊं शकल्या. १९४१ मध्यें हाफकीन इन्स्टिट्यूटमध्यें वेगवेगळ्या सुयांचे ५० हजार डोस तयार करण्यांत आले. पिसाळलेलीं कुत्रीं चावलेल्या ७,९८४ लोकांना १०३ केंद्रांत उपचार करण्यांत आला. युद्धपरिस्थितीमुळें इस्पितळांच्या व दवाखान्यांच्या वाढीस थोडा पायबंद बसल्याचें अहवालावरून दिसून येतें.

### जगांतील रेडियो-गृहें

जगांत सध्यां सुमारें ४० कोटि लोक रेडियो ऐकतात. दरसाल सुमारें १ कोटि रेडियो सेट्सची भर पडते. युद्धविषयक बातमी ऐकण्याची उत्सुकता रेडियोच्या लोकप्रियतेच्या मुळाशीं आहे. जानेवारी १९४२ मध्यें सर्व जगांत मिळून २,८३६ रेडियोगृहें होतीं, त्यांपैकी १३९८ उत्तर व मध्य अमेरिकेंत, ५०८ दक्षिण अमेरिकेंत, युरोप, रशिया व तुर्कस्थान ह्यांत मिळून ४७२, आशियांत २१६, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमध्यें १६५ व आफ्रिकेंत ७७ होतीं. गेल्या ६ वर्षांत रेडियोगृहांत ८०० गृहांची भर पडली. युद्धापूर्वी जर्मनींत ३० रेडियो स्टेशन्स होतीं. जिंकलेल्या प्रदेशांत त्याच्या हातीं आणखी ९८ स्टेशन्स आहेत. त्यांपैकी १६ रशियन हद्दींत आहेत. बातमी व प्रचार ह्यांस रेडियोवर अधिकाधिक वेळ दिला जात असला, तरी अद्याप ५०% वेळ संगीतानेंच व्यापला जातो.

*Studies in Agricultural Economics—Study No. 1*

**THE FARMER**

**HIS WELFARE & WEALTH**

BY

DR. M. G. BHAGAT, M. A., Ph. D.

WITH A FOREWORD BY

DEWAN BAHADUR

SIR T. VIJAYARAGHAVACHARYA, K. B. E.

**Price Rs. 10 nett**

Personally I can honestly call this book a fascinating study. It is so true a picture of the country-side. I congratulate the author on the result.

*T. Vijayaraghavacharya.*

*Published by*

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT**

**Sir Vithaldas Thakersey Memorial Building**

**9 Bakehouse Lane, Fort, Bombay.**

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा
### (सन १९४३)

**प्रॅक्टीस अँड लॉ ऑफ बॅन्किंग भाग १ ला.**

प्रश्नः—एका बँकेंत अ नें आपले नांवचें चालू खातें उघडलें असून त्यांत त्याची जमा बाकी (G. Balance) शिल्लक आहे. त्या खात्यावर चेक सोडण्याचा अधिकार त्यानें 'ब' ला दिला आहे. कांहीं दिवसांनीं बँकेला असें कळलें कीं, 'अ'च्या मेंदूमध्यें कांहीं बिघाड झाला असून, त्याला कांहीं दिवस तरी त्याच्या पैशासंबंधीच्या व्यवहारावर देखरेख ठेवतां येणें शक्य नाहीं व मध्यंतरी त्याला वेड्याच्या इस्पितळांत पाठवलें आहे.

अद्यापि ब ला अ च्या खात्यावर चेक सोडण्याचा अधिकार राहील काय ?

सन १८७२ च्या इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टमधील से.१२ मध्यें, ज्या मनुष्याचें डोकें नेहमीं शुद्धीवर नसतें परंतु कधीं कधीं शुद्धीवर असतें अशा मनुष्यास त्याचें डोकें शुद्धीवर असतांना करार करतां येण्याची तरतूद केली आहे. तसेंच ज्या मनुष्याचें डोकें नेहमीं शुद्धीवर असतें परंतु कधीं कधीं त्यास वेडाची लहर येते त्या मनुष्यानें केलेला करार वेडाच्या लहरींत केलेला असूं नये.

करार करतेवेळीं, करार करणाऱ्या इसमांना आपण करीत असलेल्या करारांत आपणावर कोणत्या अटी बंधनकारक आहेत व त्या करारापासून आपल्या हितसंबंधावर काय परिणाम होतील हें समजलें पाहिजे.

अ नें तो शुद्धीवर असतांना ब ला आपल्या खात्यावरील चेक काढण्याचा अधिकार दिलेला आहे व त्यावेळीं अ व ब हे दोघेहि, त्यांनीं काय करार केला आहे व त्याचा परिणाम त्यांच्या हितसंबंधावर काय होईल हें समजण्याच्या परिस्थितींत होते. व पुढें जरी अ चें डोकें फिरलें असलें तरी ब नें अ करतां केलेले सर्व व्यवहार अ वर कोणतेही प्रकारचें दडपण न आणतां व सचोटीनें केले आहेत असें सिद्ध करण्याची जबाबदारी ब वर से. १६ प्र. पडते.

यावरून ब चा अ च्या खात्यांतील रक्कम चेकनें काढण्याचा पूर्वीचा अधिकार कायम रहातो व ब ला तसें करूं देण्यांत बँकेस कांहीं धोका नाहीं.

१८७३ च्या गव्हर्नमेंट सेव्हिंग्ज बँक ॲक्ट से. १२ मध्येंहि वेड लागलेल्या अगर डोकें शुद्धीवर नसलेल्या मनुष्याचे पैसे त्यानें वेड लागण्यापूर्वी तशा तऱ्हेचा अधिकार दिलेल्या मनुष्याच्या मंडळीस द्यावेत व तशा तऱ्हेचा अधिकार दिला नसल्यास बँकेच्या व्यवस्थापकानें वेळोवेळीं सदर इसमाच्या खात्यांतील पैसे त्यास लागतील त्याप्रमाणें कोणातरी योग्य माणसाचे स्वाधीन करावेत व तशी त्याजकडून पावती घ्यावी, असें सांगितलें आहे.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

---

**ग्रेट ब्रिटनचे सैनिक**

ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या ४ कोटि, ६० लक्ष आहे. त्यांपैकी ४५ लक्ष लोक लष्करांत दाखल झालेले आहेत.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १८ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १९ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | २० धुळें („ प., खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | २१ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २२ शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २३ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २४ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २५ साक्री („ „) |
| ९ वांई („ „) | २६ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २७ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २८ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २९ सटाणा („ „) |
| १३ बेलापूर („ „) | ३० कळवण („ „) |
| १४ राहुरी („ „) | ३१ लासलगांव („ „) |
| १५ भिवंडी („ ठाणें) | ३२ नांदगांव („ „) |
| १६ पालघर („ „) | ३३ दोहद („ पंचमहाल) |
| १७ कल्याण („ „) | ३४ कालोल („ „) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यातील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.





# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.



## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय

# पूना गेस्ट हाऊस

फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक



## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

# ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आतेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.